भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १५१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०३/२०१७

**१) घराच्या समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन सोन्याचे दागीन्याची व पैशाची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २७/०२/२०१७ ते दि.०१/०३/२०१७ चे रात्र दरम्यान यातील फिर्यादी आपल्या घराला ताला लावुन लग्न कार्यासाठी बाहेर गावी गेले होते दि.०१/०३/२०१७ चे सकाळी ०७.३० वा. घरी परत आले तेव्हा त्याचे घराचे समोरील दाराचा ताला तुटलेला दिसला व कपाटात ठेवलेला १ मंगळसुत्र सोन्याचा ५ तोळे,२ सोन्याच्या लेडीज अंगटया ६ ग्रॅम,१ जाककानातील सोन्याचे टॉप्स ४ ग्रॅम,एक सोन्याचा गोप १०ग्रॅम, एक जोड लहान मुलीचे रिंग ०३ ग्रॅम व नगदी २५,०००/–रू. २०००/–रू.चे २० नोटा ५००/–रू.चे ५ नोटा असा एकुन १,८७,०००/–रू.चा माल दिसुन आला नाही. कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन घराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन कपाटात ठेवलेले वरिल वर्णनाचे सोन्याचे दागीने व नगदी रूपये चोरून नेल्याने फिर्यादी अनिल बंक्षी डोळस वय ३८ वर्ष रा. बेला सुभास वार्ड बेला याचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उबाडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) घराच्या समोरील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन सोन्याचे दागीन्याची व पैशाची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २८/०२/२०१७ चे १४.०० वा. ते दि. ०१/०३/२०१७ चे १८.०० वा दरम्यान यातील फिर्यादी ाि आपले परिवारासह वास्तुपुजनाचे कार्यक्रमाकरिता बाहेर गावी गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन गेटचा व समोरील दाराचा कोंढा तोडुन आत प्रवेश करून बेडरूम मधिल गोदरेज आलमारीत लॉकरमध्ये ठेवलेले एक सोन्याचा मंगळसुत्र ३ ग्रॅमे, एक सोन्याची नथ २ ग्रॅम, २०००/–रू. १५ नोटा, ५००/–रू.च्या १०नोटा, १०रू.चे ५ बंडल एकुन नगदी ४०,०००/– असा एकुन ५०,०००/–रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी अंबादास कारूजी नागदेवेवय ६५ वर्ष रा. उज्जल नगर मुरमाडी याचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४५४,४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. टेभुर्णीकर पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३) शेताचे विहीरीवर लावलेली मोटार चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २८/०२/२०१७ चे २०.०० वा. ते दि. ०१/०३/२०१७ चे ०६.०० वा दरम्यान यातील फिर्यादी चे शेतावरिल विहीरीवर लावलेली एक मास्क्रोट कंपनीची २ एच.पी. ची मोटार किंमती ५०००/– रू. ची कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन चोरून नेल्याने फिर्यादी रामु मोळकु रांहागडाले वय ४१ वर्ष रा. येरली याचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. श्रीवास पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**४) बॅटरी चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक माहे १०/२०१६ मध्ये यातील फिर्यादीचे स्वराज मजदा क्र. एमएच.३६ एफ १०४० ला लागलेली टाटा कंपनीची बॅटरी क्र. ७५७१३२०एच. ५०४१६ किंमती ६,१००/–रू. ची आरोपीने चोरून नेल्याने फिर्यादी राजेश मनराज पटले वय ४६ वर्ष रा. पंचशील वार्ड साकोली याचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

५) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–

दिनांक ०१/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. जवाहरनगर, पवनी, तुमसर, लाखांदुर व येथे अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १९ लिटर हातभटटी दारु किंमती १,०४०/–रु. व देशी दारु ३ लिटर ६०० मिली लिटर किंमती २०६०/–रु. तसेच जुगारातुन किंमती २,११,२९० /–रु. असा एकुण किंमती २,१३,३५०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.